# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ६८ वा रविवार दि.११ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## जरांगेंच्या आडून उद्धव ठाकरे, पवारांचे राजकारण : राज ठाकरे



छ. संभाजीनगर : प्रतिनिधी माझा महाराष्ट्र दौरा सुरू झाला तेव्हा मी मनोज जरांगे पाटील यांचे नावही घेतले नव्हते. मात्र मुद्दाम माझ्याकडे काही माणसे पाठवून घोषणा देण्यात आल्या. घोषणाबाजी करणा-या या लोकांचे शरद पवार यांच्यासोबत फोटो आहेत. काल बीडमध्ये घडलेल्या प्रकारात तर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा जिल्हाप्रमुखच सहभागी होता.

जरांगे पाटलांच्या आंदोलनाच्या आडून शरद पवार आणि उद्धव ठाकरे हे विधानसभेत मते मिळवण्यासाठी राजकारण करत आहेत. मात्र तुम्हाला जे करायचं ते करा, पण माझ्या नादी लागू नका. नाहीतर माझी पोरं काय करतील हे तुम्हाला समजणारही नाही, असा आक्रमक इशारा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिला. ते छत्रपती संभाजीनगर येथील पत्रकार परिषदेत बोलत होते. या राजकीय नेत्यांनी माझ्या नादी लागू नये, माझे मोहोळ उठलं तर यांना निवडणुकांमध्ये सभाही घेता येणार नाहीत. कारण त्यांच्याकडे प्रस्थापित असतील तर माझ्याकडे विस्थापित आहेत, असा घणाघात राज ठाकरेंनी केला आहे.

मराठा आरक्षणावरून सुरू असलेल्या राजकारणावर हल्लाबोल करताना राज ठाकरे पुढे म्हणाले की, तुमचा देवेंद्र फडणवीस यांच्यावर राग असेल तर तुम्ही त्यांच्यावर टीका करा. पण त्यासाठी समाजात कशाला भांडणे लावत आहात? शरद पवार यांच्यासारखा ज्येष्ठ नेता महाराष्ट्राचा मणिपूर होईल, असे म्हणतो. याचा अर्थ मतांसाठी या लोकांकडून जातीजातींमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम सुरू आहे, असा गंभीर आरोप राज ठाकरेंनी केला आहे.

## जरांगे म्हणजे आधुनिक मोहम्मद अली जिना



मुंबई : प्रतिनिधी नितेश राणे यांनी मनोज जरांगे पाटील यांचा उल्लेख आधुनिक मोहम्मद अली जिना असा केला आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मागील काही दिवसांपासून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मनोज जरांगे पाटील आणि नारायण राणे यांच्यात देखील आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. दरम्यान, सिंधुदुर्गमध्ये एका सभेला संबोधित करताना नारायण राणे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका केली होती. राणे म्हणाले होते की, जरांगे म्हणाले 'राणे मराठवाड्यात येत असतील तर येऊ दे, आमच्याकडे काय पाहणार? आम्ही कपडे घालतो.' तू कपडे घातलेस तरी तसाच दिसतो आणि कपडे काढलेस तरी तसाच दिसतो. तुझ्यात आहे काय बघण्यासारखं? इतक्या वर्षांत ब-याच जणांनी दाढी वाढवली पण ते छत्रपती झाले का, नाही होत छत्रपती. जातपात, धर्म बाजूला ठेवा आणि विकासाच्या मुद्यावर एकत्र या, असे आवाहन नारायण राणे यांनी केले होते. यातच आता भाजप आमदार नितेश राणे यांनीही मनोज जरांगे पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे. जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे एक तरी मराठा समाजातील तरुणाचा फायदा झाला असेल तर त्याचा हिशेब आम्हाला द्या. मनोज जरांगेंच्या आंदोलनामुळे मराठा समाजापेक्षा मुस्लिम समाजाचा फायदा अधिक झाला आहे. मनोज जरांगे म्हणजे आधुनिक मोहम्मद अली जिना तर नाही ना, असा प्रश्न घराघरांमधून विचारला जातोय.

## काँग्रेस चे नाना पटोले यांना भिम आर्मी चे निवेदन



लातूर / प्रतिनिधी :- लातूर शहर व जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसापासून विविध ठिकाणी दलित युवक, विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ गांधी चौक येथे सर्व आंबेडकरी संघटना पक्षांच्या वतीने तीन दिवसीय धरणे आंदोलन संपन्न झाले या आंदोलनात सर्व प्रकरणांमध्ये ३०२ व ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा सर्व प्रकरणाची चौकशी सीआयडी मार्फत करण्यात यावी सर्व प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावे वरील सर्व प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे लातूर जिल्ह्याला दलित अन्यायग्रस्त जिल्हा घोषित करावे वरील सर्व प्रकरणातील तपास अधिकारी बदलण्यात यावे गांजूर प्रकरणातील आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांवरील ३५३ सारखे खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे. अशा मागणीचे निवेदन आज काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांना देण्यात लोकप्रतिनिधी म्हणून वरिल सर्व प्रकरणातील पिडीत कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा. अन्यथा मागण्या मान्य न झाल्यास पुढील आंदोलनाचा टप्पा १५ ऑगस्ट रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क या ठिकाणी सर्व आंबेडकरवादी संघटना पक्षांच्या वतीने अर्धनग्न आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा निवेदना मार्फत देण्यात आला यावेळी भिम आर्मी चे माजी महाराष्ट्र प्रदेश संघटक अक्षय धावारे जिल्हा अध्यक्ष विलास चक्रे जिल्हा सचिव बबलू शिंदे तालुका अध्यक्ष मारूती घनगावकर शहर उपाध्यक्ष परमेश्वर ताकपिरे शहर सचिव समाधान झोडपे अजय भांडेकर विशाल पैठणे आदी पदाधिकारी उपस्थित होते

## दोनशे रुपयांसाठी युवकाची निर्घृण हत्या



पनवेल : तालुक्यातील शिरढोण गावाजवळ मुंबई-गोवा महामार्गावरील शोरूमशेजारी गुरुवारी सायंकाळी ४६ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ माजली होती. मृत व्यक्तीचे नाव सुशांत कुमार कृष्णा दास असे आहे. सुशांतचा गळा चिरून त्याची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी नवी मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी अवघ्या काही तासांत हत्या करणा-या २० वर्षीय अमित रामक्षय राय याला अटक केली आहे. अमित व सुशांत एकाच हॉटेलमध्ये काम करत होते. अवघ्या दोनशे रुपयांच्या वादातून हत्या झाल्याचे अमितने पोलिसांना दिलेल्या जबाबात कबूल केले.

मृत सुशांत शिरढोण येथील साईप्रसाद हॉटेलमध्ये स्वयंपाकघराचा मुख्य पर्यवेक्षक म्हणून काम करत होता. सुशांतच्या हत्येनंतर तो काम करत असलेल्या हॉटेलमधील सुशांतचे सहकारी कर्मचारी व इतरांची चौकशी पोलिसांनी गुरुवारी सकाळी सुरू केली.

## चंद्रबोधी पाटील ट्रस्टी चेअरमन नाहीत..!

**दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया संस्थापक अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर ( राष्ट्रीय कार्याध्यक्ष ) यांचेवतीने आयु. चंद्रबोधी पाटील यांच्या दिनांक : २१/७/२०२४ रोजीच्या ज्ञापनला जाहीर उत्तर**

मुंबई पतिनिधी / के. एच. हनवते :- दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियात अनेक वर्षे अध्यक्ष/चेअरमन पदाचा वाद होता. महाउपासिका : मीराताई आंबेडकर आणि पी. जी. ज्योतीकर यांच्या नंतर, दोन्ही पक्ष रावलिया / चंद्रबोधी पाटील आणि आम्ही एकत्र येऊन निर्णय घेतला की, कोर्ट कचेऱ्या पासून अलिप्त राहायचे, वेळ, पैसा खर्च होणार नाही, एकत्र धम्म कार्य करू या ! त्यानुसार एकत्र आलो, परंतु त्यांनी एकता मोडण्याचीच कार्यवाही केली. उदा. घरी बसून परस्पर नियुक्त्या करणे, कमिटी बरखास्त करणे इत्यादी करुन मला विचारल्याशिवाय काहीही करायचे नाही, असे सुनावणे, संस्थेची (मीराताई युनिट) जिथे मालमत्ता आहे तेथे अडचणी निर्माण करणे, चेअरमन शिवाय परस्पर ट्रस्टीची बैठक बोलावणे, पत्र व्यवहार करणे, एवढेच नाही तर त्यांनी दिनांक: २९/७/२०२३ च्या पत्रान्वये, ज्यांनी ४५ वर्षे संस्थेचे अध्यक्ष पद भुषवून संस्था व धम्म देशभर रुजवला त्या संरक्षक महाउपासिका : मीराताई आंबेडकर, ट्रस्टी चेअरमन डॉ. हरीश रावलिया, ट्रस्टी/कार्याध्यक्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू : डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर आणि ट्रस्टी /आंतरराष्ट्रीय सचिव कॅप्टन प्रविण निखाडे यांनाच पदावरून दूर करून एकत्रिकरणाला तिलांजली दिली.

१)या सर्व पार्श्वभूमीवर नाईलाजाने, मुंबई केंद्रीय कार्यालयात दिनांक: २/८/२०२३ रोजी केंद्रीय बैठक संपन्न झाली. त्यामध्ये चंद्रबोधी पाटील यांनी संरक्षक - महाउपासिका मीराताई आंबेडकर, ट्रस्टी चेअरमन-डॉ. हरीश रावलिया, ट्रस्टी /कार्याध्यक्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू : डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर आणि ट्रस्टी / आंतरराष्ट्रीय सचिव कॅप्टन प्रविण निखाडे यांच्या विरुध्द केलेल्या कारवाईमुळे कार्यकर्ते व जनतेमध्ये प्रचंड असंतोष, चीड निर्माण झालेली असल्यामुळे चंद्रबोधी पाटील यांचा तीव्र शब्दात निषेध करण्यात येऊन, मीराताई युनिटमध्ये कोणतीही ढवळाढवळ, मनमानी केली, तर होणाऱ्या परिणामांना चंद्रबोधी पाटील स्वतः जबाबदार राहतील व यापुढे त्यांचे नाव राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून लेटर हेडवर असणार नाही, असेही एकमताने ठरविण्यात आले.


२) त्यानंतर संस्थेचे ट्रस्टी चेअरमन डॉ. हरिश रावलिया यांनी संस्थेच्या बोर्ड ऑफ ट्रस्टीची दिनांक: २४/८/२०२३ व दिनांक: ५/९/२०२३ रोजी बैठक डॉ. आंबेडकर भवन, दादर येथे बोलाविण्यात आली. त्यानुसार आयु. चंद्रबोधी पाटील आणि इतर तीन यांना ट्रस्टी पदावरुन कमी करण्यात आले. तसेच ड. सुभाष जौंजाळे (ट्रस्टी चेअरमन) यांनी चंद्रबोधी पाटील यांच्या हुकुमशाही कार्यपध्दतीमुळे व डॉ. भीमराव यशवंत. आंबेडकर यांना विश्वासात न घेता त्यांचेबरोबर एकत्रिकरण केले असल्याचे निदर्शनास आल्याने आयु. चंद्रबोधी पाटील यांना संस्थेच्या कामकाजातून बेदखल करण्यात आले.

३)धर्मदाय आयुक्त, बृहन्मुंबई यांना जा.क्र. इड्ख/उउ/चणचइ-ख/०७/२०२४ दिनांक: १९/१/२०२४ अन्वये संस्थेच्या ट्रस्टीची बैठक बोलविणे, पत्र व्यवहार करणे इत्यादी बाबतचे सर्व अधिकार ट्रस्टी चेअरमन यांना असून त्याप्रमाणे कार्यवाही होतांना दिसून येत नाही. केवळ ट्रस्टी असलेले आयु. चंद्रबोधी पाटील यांनी परस्पर बैठका घेणे, पत्र व्यवहार करणे, नियुक्त्या करणे इत्यादी बाबी ट्रस्टी चेअरमन यांच्या संमतीशीवाय व सर्व ट्रस्टीच्या बैठकीशिवाय केलेल्या आहे. ते सर्व बेकायदेशीर आहे व आयु. चंद्रबोधी पाटील यांनी दिनांक: ३१/५/२०२२ नंतर केलेले सर्व पत्रव्यवहार /प्रस्तावांचा विचार करु नये असे कळविलेले आहे. तसेच सदर पत्राची प्रत चंद्रबोधी पाटील यांना दिलेली आहे.

४)ट्रस्टी चेअरमन डॉ. हरिश रावलिया व ट्रस्टी / राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंत. आंबेडकर यांनी प्रसिध्दी पत्र जा.क्र. (बीएसआय/सिसि/मुंबई) इड्ख/उउ/चणचइ-ख/१५/२०२४ दिनांक: १४/२/२०२४ अन्वये, दिनांक: ३१/५/२०२२ रोजीची हैदराबाद (तेलंगणा) येथील ट्रस्टी, केंद्रीय कार्यकारिणी, विविध राज्याचे अध्यक्ष, सरचिटणीस, कोषाध्यक्ष यांच्या संयुक्त मिटींगमध्ये सर्वानुमते डॉ. हरीश रावलिया यांचा ट्रस्टी चेअरमन पदाचा कार्यकाळ ५ वर्षे वाढविणे, ट्रस्टी बैठक केवळ ट्रस्टी चेअरमन यांनी बोलविणे, संस्था व्यवस्थापन बाबतचे सर्व अधिकार ट्रस्टी / राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांना देणे इत्यादी निर्णय घेतले, त्यानुसार, आयु. चंद्रबोधी पाटील व आयु. शंकर ढेंगरे यांना विशाखापट्टणम (आंध्रप्रदेश) मधील दिनांक : २६/२/२०२४ रोजी बैठक बोलविण्याचा अधिकार नसल्याने सदरची मिटींग बेकायदेशीर आहे, असे कळविलेले आहे. (तरी सुध्दा त्यांनी अनधिकृतपणे बैठक घेतली असून, सदर बैठकीस ५० पेक्षा जास्त लोक उपस्थित नव्हते.)

५) सन १९८२ साली नागपूर दिक्षाभूमीचे पूर्वीचे ट्रस्टी व तत्कालीन सभापती यांच्या आर्थिक सहयोगाने एस. व्ही. रामटेके आणि सहकारी यांनी मीराताईंना विरोध केला. १९८२ पासून ते आजपर्यंत बौध्दधम्माच्या चळवळीचे नुकसान केले. कोर्ट केस यामुळे धम्मकार्यासाठी श्रम, पैसा, वेळ गेल्याने धम्माच्या चळवळीला अडथळे निर्माण केले. चंद्रबोधी पाटील हे त्यांचेच प्रतिनिधी आहेत.

६)दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या आमच्या मीराताई युनिटने देशभर २७ राज्य /प्रदेश शाखा निर्माण केल्या असून, संस्थेच्या २४ प्रकारच्या धम्म प्रशिक्षण शिबीरांच्या माध्यमातून बौध्द सदस्य, सक्रिय बौध्द सदस्य, आजीवन बौध्द सदस्य, केंद्रीय शिक्षक, केंद्रीय शिक्षिका, बौद्धाचार्य, समता सैनिक दल - सैनिक, वार्षिक शिबीर गॅझेट, वार्षिक सैनिक शिबीर गॅझेट असे संपूर्ण लेखाजोखाचे वार्षिक गॅझेट दिनांक: २१/७/२०२४ रोजी चैत्यभूमीमध्ये प्रकाशित केलेले आहे. त्याप्रमाणे आयु. चंद्रबोधी पाटील यांनी ३४ वर्षाच्या कालावधी मधील लेखा-जोखा बौध्द जनतेला द्यावा की, ज्याच्यावरुन त्यांचे कार्य लोकांना समजून येईल !



७) आमचा संपूर्ण देशभर (महाराष्ट्रातील ५८ जिल्हा शाखा व देशातील २७ राज्य शाखामध्ये) वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचा कार्यक्रम होत आहे. चैत्यभूमीमध्ये आषाढ पौर्णिमा दिनांक : २१/७/२०२४ पासून ते आश्विन पौर्णिमा दि. १७/१०/२०२४ पर्यंत ३० प्रवचन मालिकेचा कार्यक्रम सुरु केलेला आहे. आयु. चंद्रबोधी पाटील वर्षावासाचा कार्यक्रम घेत नाहीत. त्यांचा यावर्षीही नाही, याबाबत त्यांनी खुलासा करावा.

८)आयु. चंद्रबोधी पाटील हे नागपूर मधील रहिवासी असून, नागपूर दिक्षाभूमी ही दि. बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडियाची असून सुध्दा त्यांनी त्याबाबत काहीही केलेले नाही. तसेच त्यांच्याकडे चारच कार्यकर्ते असल्याने, त्यांनी नागपूर दिक्षाभूमीमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा एकही जाहीर कार्यक्रम केलेला नाही. दीक्षाभूमीसमोर एक स्टॉल लावून बसतात, देशभर त्यांच्याकडे कार्यकर्तेच नाहीत. मागील महिन्यापासून दीक्षाभूमी आंदोलन चालू आहे, दिक्षाभुमी सध्या मनुवाद्यांच्या ताब्यात आहे. परंतू आयु. चंद्रबोधी पाटील तिकडे फिरकले सुध्दा नाही. याचा त्यांनी खुलासा करावा.

९) बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया स्थापन केलेली असून, ते स्वतः पहिले अध्यक्ष राहिले आहेत, याचे भान चंद्रबोधी पाटील यांना आहे काय..? ज्याला जन मान्यता नाही, तो चेअरमन / अध्यक्ष कसा होऊ शकतो..? गल्लीत ओळखत नाहीत, पण दिल्लीचा बॅनर घेऊन फिरतात ! त्यांचे ऑफीस नाही, त्यांच्याकडे संस्थेचे दफ्तर / स्टेशनरी सुद्धा नाही. सन २००० पासून ते स्वयंघोषित अध्यक्ष, सर्वेसर्वा म्हणून मिरवत आहेत, २००० ते २०२४ या कालावधीमध्ये त्यांनी लाखो रुपयांचा निधी गोळा केलेला आहे. परंतु त्याचा हिशोब त्यांनी दिलेला नाही. मात्र जे खरे धम्म कार्य करतात त्यांना आयु.चंद्रबोधी पाटील अडचण आणत आहेत. ते धम्माचे प्रचारक नसून, मारक आहेत ! अशा लोकांमुळे दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे नाव उंचावत नसून, खुजे होत आहे ! तसेच बौध्दांची पत खालावली जात आहे, त्यामुळे जनतेने चंद्रबोधी पाटील यांना कोणीही मदत / सहकार्य करू नये आणि आयु. चंद्रबोधी पाटील ट्रस्टी चेअरमन असतील तर त्यांनी धर्मादाय आयुक्त यांच्या मान्यतेची कागदपत्रे जनतेसमोर उघड करावीत अन्यथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुनबाई महाउपासिका : मीराताई आंबेडकर आणि नातू डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांची दिनांक : २९/७/२०२३ व २१/७/२०२४ च्या पत्रान्वये म्हणजे दोन वेळा कमी केल्याच्या बदनामीबद्दल त्यांच्या विरुद्ध न्यायालयीन कारवाई करावी असा ठराव संस्थेच्या डॉ. आंबेडकर भवन, दादर (पूर्व ), मुंबई येथील केंद्रीय कार्यालयात दिनांक २४/७/२०२४ रोजी ट्रस्टी व केंद्रीय, केंद्रीय विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई प्रदेश शाखेचे पदाधिकारी यांच्या बैठकीत करण्यात आला.

१०) संस्थेचे देशातील जे कामकाज चालू आहे, ते आयु. चंद्रबोधी पाटील मुळे नाही, तर आम्ही खाली सह्या करणारे आणि आमच्या बरोबरचे हजारो पदाधिकारी व लाखो कार्यकर्ते करीत आहोत.

११)धर्मदाय आयुक्त यांच्याकडे दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या ट्रस्टी बाबतचे बरेच चेंज रिपोर्ट प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत आयु. चंद्रबोधी पाटील यांना इतरांना नोटीस /ज्ञापन देण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यांनी वरीलप्रमाणे मीराताई आंबेडकर व डॉ. भीमराव य. आंबेडकर यांच्यावर वरीलप्रमाणे दोन वेळा कारवाई केली असल्याचे सोशल मीडिया वर प्रसारित करून डॉ. आंबेडकर घराण्याची बदनामी केलेली आहे. त्यामुळे आयु चंद्रबोधी पाटील यांच्या विरुद्ध आंबेडकरी समाजात, संस्थेच्या देशभर पदाधिकारी / कार्यकर्त्यांत तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. त्यांनी प्रसिद्ध केलेले ज्ञापन / मेमोरँडम दिनांक १४/८/२०२४ पर्यंत मागे घ्यावे, अन्यथा आम्ही कायद्यानुसार न्यायालयीन कार्यवाही करू आणि त्याच्या खर्चाची व परिणामाची संपूर्ण जबाबदारी चंद्रबोधी पाटील यांच्यावर राहील याची त्यांनी नोंद घ्यावी.असे प्रसिद्धी पत्रक / नोटीस पत्रक द्वारे,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव य. आंबेडकर ( ट्रस्टी / राष्ट्रीय कार्याध्यक्ष ), डॉ हरीश रावलिया (ट्रस्टी चेअरमन ), कॅप्टन प्रविण निखाडे (ट्रस्टी / आंतरराष्ट्रीय सचिव ), एस के भंडारे (राष्ट्रीय उपाध्यक्ष / मुंबई केंद्रीय कार्यालय प्रमुख ), अँड डॉ एस एस वानखडे (राष्ट्रीय सचिव व केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख) यांनी आयु. चंद्रबोधी पाटील यांना व दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या देशभरातील सर्व शाखांना पाठविले आहे.

## संपादकीय....

# संचिताचे जळीत!

संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला त्यांच्या जयंतीच्या आदल्या रात्रीच लागलेल्या आगीकडे केवळ दैवदुर्विलास म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही कोल्हापुरातील संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला लागलेल्या आगीत केवळ कोल्हापूरचाच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राचा एक सांस्कृतिक ठेवा जळून भस्मसात झाला. या नाट्यगृहाच्या फक्त भिंती आता उरल्या आहेत. वास्तुरचनेचा अप्रतिम नमुना असलेल्या या नाट्यगृहाशी रंगमंचावर काम करणाऱ्या प्रत्येक कलाकाराचे अत्यंत हृद्य नाते होते. नाट्यगृहातल्या रंगमंचावर उभे राहिले, की समोर दिसणारे प्रेक्षागृह आणि त्याच्या मागच्या भिंतीवर असलेल्या दिग्गज कलाकारांच्या तसबिरी यामुळे कलाकारालाही आपण या दिग्गजांच्या साक्षीने कला सादर करत आहोत, अशी नम्र भावना मनात निर्माण होत असणार. या भावनेचे मोल किती मोठे आहे, याचे शब्दांत वर्णन करणे अशक्य. साहजिकच प्रेक्षकांनाही या नाट्यगृहात मिळणारा कलानुभव दाद देण्याचे भान देणारा. राजर्षी शाहू महाराज छत्रपती यांच्या पुढाकारातून हे रंगमंदिर शतकभरापूर्वी उभे राहिले. पॅलेस थिएटर नावाने त्या वेळी उभ्या राहिलेल्या नाट्यगृहाचे नाव १९५७ मध्ये केशवराव भोसले नाट्यगृह असे केले गेले. १९८४ मध्ये त्याचे नूतनीकरण झाले, तर नंतर २०१४ मध्ये फेरनूतनीकरण केले गेले. मात्र, गेली चार दशके या नाट्यगृहाच्या देखभाल–दुरुस्तीवर कायमच प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहे. ध्वनिव्यवस्थेतील त्रुटींपासून इतर काही समस्यांकडे लक्ष वेधूनही त्यावर काम झाले नाही. परवाच्या गुरुवारी रात्री लागलेली आग तर निकृष्ट दर्जाच्या कामामुळे लागल्याचा गंभीर आरोप कोल्हापूर शहर, जिल्हा नागरिक कृती समितीने केला आहे. नाट्यगृह जळाल्यानंतर आता त्याच्या फेरउभारणीची खंडीभर आश्वासने दिली जात आहेत. मात्र, मुळात हे ऐतिहासिक नाट्यगृह जीव तोडून आपल्या जखमांवर इलाज करण्याचा टाहो फोडत होते, तेव्हा हे आश्वासनवीर कुठे होते, हा प्रश्न उरतोच. या आगीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरातल्या या प्रसिद्ध नाट्यगृहाच्या समस्यांची उजळणी होत असताना, पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, सांगली, कराड किंवा अन्य ज्या ज्या शहरांत असा सांस्कृतिक ठेवा आहे, त्याचीही आठवण या आश्वासनवीरांनी काढली तर बरी. प्रशासकीय अनास्थेचे दर्शन तेथेही निरंतर घडतेच आहे. त्यामुळे कोल्हापुरातील घटना ही केवळ एका नाट्यगृहाला लागलेली आग एवढ्याच मर्यादित चष्म्यातून बघून चालणार नाही. राज्यभरातच सुरू असलेल्या सांस्कृतिक ऱ्हासपर्वातील ती एक दुर्दैवी घटना ठरली आहे, हे समजून घ्यायला हवे. कारण, कलाकार–प्रेक्षकांचे भावनिक नाते असलेली वास्तू आगीत जळून भस्मसात होते, तेव्हा केवळ इमारत खाक होत नाही, तर मोठे सांस्कृतिक संचित बेचिराख होत असते. अर्थात, नाट्यगृह हे संस्कृतीचे केंद्र आहे याची जाणीव त्यासाठी असायला हवी. तशी ती आहे, याची खात्री देणे सद्या काळात कठीण आणि नाट्यगृहांचा आब राखला जात नसल्याची उदाहरणे मुबलक. नागपुरात वसंतराव देशपांडे सभागृहाची सध्या दुरुस्ती सुरू आहे. त्यामुळे तीन दशके सुरू असलेला वसंतराव देशपांडे संगीत महोत्सव यंदा रद्द करावा लागला. बरे, ही अशी दुरुस्ती वर्षानुवर्षे केली जाते. पण तसे करूनही प्रश्न कायम राहतात, ही खरी रड आहे. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिराच्या दुरवस्थेबद्दल तर अनेक कलाकार सातत्याने व्यक्त झाले आहेत. महापालिका प्रशासनाची नाट्यगृहे खासगी नाट्यगृहांच्या तुलनेत स्वस्त असतात, त्याचे मुख्य कारण समाजाची सांस्कृतिक भूक भागवणे हे असते. ती भागवताना नाट्यगृहातील व्यवस्थांच्या पालन–पोषणाकडेही तितकेच लक्ष पुरविणे आवश्यक. यंत्रणा नेमूनही ते होत नाही, याचा सरळ अर्थ असा, की नाट्यगृहांच्या देखभाल–दुरुस्तीकडे नीट लक्ष देण्याची आस्थाच कोणत्याही पातळीवर नाही. मुंबई, ठाण्यातील नाट्यगृहे, सांगली, कराड, साताऱ्यातील रंगमंदिरे येथेही महापालिका किंवा नगरपालिका प्रशासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या रंगमंदिरांची अवस्था थोड्याफार फरकाने अशीच. अस्वच्छ स्वच्छतागृहे, रंगभूषेसाठी असलेल्या खोल्यांतले फुटलेले, अपारदर्शक आरसे, वेशभूषेसाठीच्या खोल्यांचीच मोडलेली दारे किंवा खिळखिळ्या झालेल्या कड्या, प्रेक्षागृहातील मोडक्या खुर्च्या, कायम 'अंशत:'च सुरू असणारी वातानुकूलन यंत्रणा, नाट्यानुभव घेता घेता अचानक प्रेक्षकांच्या पायावर घरंगळणारे उंदीर हे महाराष्ट्रातील नाट्यगृहांच्या दुरवस्थेचे सार्वत्रिक चित्र. कलाकारांच्या अभिव्यक्तीला योग्य स्थान आणि आश्रय देणारे द्रष्टे नेतृत्व महाराष्ट्रात एके काळी होते. सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची नाटके, संगीत कार्यक्रमांना हे नेते स्वत: हजेरी लावायचे. आता ते दिवस सरले. आता बरेचसे नेते डीजे लावलेल्या मिरवणुका आणि नाचांचे आश्रयदाते असतात. यावर कडी म्हणजे नाट्यगृहांचा राजकीय कार्यक्रमांसाठी होणारा वापर. हा तर एक गंभीरच विषय होत चालला आहे. राजकीय नेते–कार्यकर्त्यांची शिरजोरी अशी, की बराच काळ आधी रंगमंदिर आरक्षित केलेल्या एखाद्या संस्थेला, ते 'आपल्या' राजकीय कार्यक्रमासाठी आयत्या वेळी त्यांचा कार्यक्रम रद्द करण्याची 'गळ' घालू शकतात. ही 'गळ' म्हणजे कलाकारांसाठी 'फास' असतो, याबाबत आता 'गळे' काढले, तरी उपयोग होत नाही, अशी सद्या:स्थिती. यात कशी जोपासली जाणार संस्कृती? प्रशासन, राजकारण यांच्याकडे अंगुलिनिर्देश करताना जोडीने प्रेक्षक म्हणून समाजाची आणि कला–संस्कृतीला दिशा देणाऱ्या कलाकारांची जबाबदारीही विसरून चालणार नाही. प्रेक्षकांकडे मनोरंजनाचे बहुपडदा पर्याय उपलब्ध झाले आहेत. त्यात त्याला नाट्यगृहाकडे खेचून आणणारा पर्याय देण्याचे मोठे आव्हान कलाकारांसमोर आहे. पुण्या–मुंबईत नाटकासारख्या कलाविष्कारात अनेक प्रयोग होतात, त्यासाठी त्यांना स्थान देणारी वेगवेगळी छोटी खासगी नाट्यगृहेही तयार झाली आहेत. मात्र, ते सर्वसमावेशक मंच आहेत का, हा प्रश्न. या दोन्ही शहरांत होणाऱ्या महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा पूरक वातावरणासाठी निश्चित उपयोगी असल्या, तरी त्यातून पुढे आलेले कलाकार या मंचांचा चित्रपट, मालिकांमध्ये पाऊल ठेवण्याची पायरी म्हणूनच उपयोग करतात का, हेही विचार करण्याजोगे. असे छोटे मंच प्रोत्साहनास पूरक असले, तरी त्यांची स्वतंत्र सांस्कृतिक बेटे निर्माण होण्याची शक्यता सर्वसमावेशकतेला आणि पर्यायाने संपूर्ण समाजाच्या सांस्कृतिक उन्नयनाला पुरेशी पडत नाही, हे वास्तव आहे. इथे येणारा विशिष्ट वर्गातील प्रेक्षक इतर लोककलांकडे तुच्छतेने पाहत असेल, तर ती सांस्कृतिक वर्गवादाचीच खूण आहे. मुद्दा असा आहे, की छोट्या–मोठ्या कार्यशाळांपासून महोत्सवांपर्यंत कलाकार घडविण्याचे, त्यांना मंच देण्याचे भूत सगळ्यांवर इतके स्वार आहे

# स्वातंत्र्याची माझी कल्पना

कित्येक वर्षांच्या गुलामगिरीतून देश स्वतंत्र झाला. भारतीयांना स्वातंत्र्य मिळाले .देशाला संविधान मिळाले अन् जनतेला मिळाले मूलभूत हक्क. स्वातंत्र्य जगण्याचे, स्वातंत्र्य बोलण्याचे ,स्वातंत्र्य धर्माचे आणि सोबतच मिळाली काही कर्तव्य नागरिक म्हणून पाळायची. आज देशाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला आहे पण खरं सांगा स्वातंत्र्याचा नेमका अर्थ उमगला का हो कोणाला ?परकीय शक्तीपासून मुक्ती मिळवणे एवढेच होते का स्वातंत्र्य, मग खरंच मिळाली का मुक्ती आणि जर खरचं मिळाली असेल मुक्ती तर आजही मुलींना सातच्या आत घरात हा नियम कशासाठी......? स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे ,मी स्वातंत्र्य आहे म्हणून मी नियमांना सोडून वागावे असे नाही. स्वातंत्र्य म्हणजे स्वतःचे तंत्र, स्वतः निर्माण केलेली व्यवस्था, स्वतःचे बंधन, माझे तंत्र असावेत पण त्याला काही बंधने ही असावीत. एवढा महान निसर्ग सुद्धा बंधने पाळतो. सूर्य आपल्या वेळेवरच उगवतो आणि मावळतो .तो आपले कार्य प्रामाणिकपणे करतो. अगदी तसेच मी ही माझे कर्तव्य पाळताना माझे स्वातंत्र्य जोपासले पाहिजे.मी स्वतः हून स्वतःवर काही बंधने घातली पाहिजेत, जेणेकरून माझ्या स्वातंत्र्याचा त्रास दुसऱ्याला होणार नाही. स्वातंत्र्य म्हणजे मुक्ती ,हक्क व जबाबदारी या जाणिवांचा संगम मग मुक्ती मिळाली, हक्क मिळाले पण जबाबदारी स्वीकारली का? आजही देशात दारिद्र्य, बेरोजगारी ,उपासमारी ,अनारोग्य ,, हत्या, स्त्रीभ्रूण हत्या ,हुंडाबळी अशा कितीतरी समस्यांनी समाज ग्रासला आहे. समाजाला एक वैचारिक कीड लागली आहे .स्वतंत्र देशात इतक्या समस्या कशासाठी? आजही ठिकठिकाणी माणसाचा वेगवेगळ्या प्रकारे छळ होतो. आणि जनता निर्विकार पणे पाहत असते सर्वकाही. घरात दूरदर्शनवर बातम्या पाहत असताना आपण कितीतरी अत्याचारांच्या गोष्टी ऐकतो. कित्येक निर्भय्या आहेत जागोजागी अगदी सहा महिन्याच्या, सहा वर्षाच्या मुलींपासून ते पंचाहत्तर , ऐंशी वर्षांच्या म्हातारीपर्यंत .आपल्या देशात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले.कित्येक देशभक्तांनी रक्त सांडले. त्या देशात घरातील स्त्री सुद्धा सुरक्षित नाही. स्वतंत्र भारतात मुलीला येण्यास थोडा उशीर झाला की चुकतो आई–बाबांच्या काळजाचा ठोका ...... आम्ही स्वतंत्र झालो म्हणजे आम्ही वाट्टेल तसे वागू शकतो ,जबाबदारी झटकून टाकू शकतो. मोठे झालो, शिकलो, नोकरी मिळाली, नोकरी निमित्त शहरात संसार थाटला ,मग आई–बाबांचे काय? त्यांची जबाबदारी कोण घेणार? वृद्धापासून दूर राहण्यात धन्यता मानणाऱ्या कित्येक कुटुंबातील मुले संस्कारापासून वंचित राहिली. आणि वाममार्गास लागली . संस्कार व नीतिमत्तेत शोधावे खरे स्वातंत्र्य. राहणीमानावरून स्वतंत्र न होता विचारांनी स्वतंत्र व्हावे .एखाद्या महासत्ता होणाऱ्या देशातील लोकांच्या राहणीमानाचा कित्ता गिरवण्यापेक्षा त्यांच्या आचार विचारांचा अभ्यास करावा, त्यांच्या महासत्ता होण्यासाठी आवश्यक ठरलेले त्यांचे विचार पहावे. साधी राहणी व उच्च विचारसरणीतून आपले स्वातंत्र्य जोपासावे. आपल्याला खरे स्वातंत्र्य हवे असेल तर ही विचारांची गुलामगिरी अगोदर दूर सारावी लागेल. दुसऱ्यांचे अनुकरण करण्यापेक्षा नवनिर्मिती करावी लागेल. सन्मान करावा लागेल. कष्टाची कास धरावी लागेल. स्वतःचे तंत्र निर्माण करावे लागतील .आणि बंधने पाळावी लागतील. तेंव्हा कुठे आपली यशस्वी वाटचाल चालू होईल. आकाशात झेप घेणाऱ्या पक्षाकडे लालसेने पाहून चालणार नाही तर त्याच्या पंखातील बळाचे माप घ्यावे लागेल व तेवढे बळ निर्माण करावे लागेल. आणि मग स्वतःसही निळ्याशार आकाशात कल्पनेच्या पंखाने झोकून देता येईल.आज आपण पाहतो देशात वरचेवर धार्मिक विषमता वाढत चालली आहे .संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकास धार्मिक स्वातंत्र्य बहाल केली आहेत .विविधतेने नटलेल्या सुंदर भारत देशास जणू काही काळापासून धार्मिक विषमतेचे ग्रहणच लागले आहे .स्वतंत्र भारतात एकात्मतेच्या सुंदर वृक्षाची वाढ झाली पाहिजे व एकमेकांच्या हातात हात घालून विकासाच्या दिशेने वाटचाल झाली पाहिजे . विचारांचे ज्ञानाचे मोठेपण घेऊन अब्दुल कलाम सारख्या वैज्ञानिक अवकाशाचे माप घेतो व सिंधुताई सपकाळ सारखी एक साधी नऊवारीतील बाई परदेश भ्रमण करून येते. अनेक अनाथांची आई होते .ज्यांना स्वातंत्र्याचा खरा अर्थ कळला, त्यांनी स्वतःचे स्वातंत्र्य तर जपलेच पण सोबतच इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही. दुसऱ्यालाही जगण्याचा तेवढाच अधिकार आहे. या गोष्टीचाही विचार केला.

आपण खूप नशीबवान आपला जन्म स्वतंत्र भारतात झाला. स्वतंत्र भूमीवर ,स्वतंत्र हवेत आपण श्वास घेतला .मग करूया ना विचार स्वतंत्रपणे, कशाला हवे मोबाईल सारखे खेळणे. मोबाईल वापरणे हे सुद्धा एक मानसिक गुलामगिरीच नाही का? एकदा का व्यक्ती त्याच्या चक्रव्यूहात सापडला की निघणे अवघडच.

शेवटी एवढेच म्हणेन

जपुया स्वातंत्र्य स्वतःचे आणि जपूया स्वातंत्र्य इतरांचेही. स्वतः च्या स्वतंत्र बुद्धीचा वापर करून करूया दुःख दूर जनांचे ! स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा!

-----------------------------------

**सय्यद सबिहा सुलताना शफियोद्दिन**
**सहशिक्षिका**
**गोदावरीदेवी लाहोटी कन्या पाठशाळा**
**दयाराम रोड लातूर.**

# घरी तिरंगा रोवणाराच देशप्रेमी ठरतो का?

राज्यात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने घरोघरी तिरंगा मोहीम राबवली जात आहे. ही मोहीम ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान असणार आहे. मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी नुकतेच या अभियानासाठी करण्यात येत असणाऱ्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. राज्यात सदर आठवडाभर घरोघरी तिरंगा मोहीम राबविण्यात येत आहे. हा आपला राष्ट्रीय सण असून यात सर्वांना सहभागी करुन घ्यावे आणि प्रत्येक घरापर्यंत तिरंगा पोहचवून हे अभियान यशस्वी करावे,असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी केले. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत घरोघरी तिरंगा अभियानाच्या तयारीचा आढावा मा.मुख्यमंत्र्यांनी घेतला. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अतिरीक्त मुख्य सचिव डॉ.आय.एस.चहल, विकास खारगे, महसूल विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, परिवहन विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव संजय सेठी, जलसंपदा विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांच्यासह विविध विभागांचे सचिव आणि विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्त उपस्थित होते. घरोघरी तिरंगा हे अभियान राष्ट्रभक्ती चेतवणारे अभियान असून या काळात प्रत्येक दिवशी रॅलीसह, मॅरेथॉन, सांस्कृतिक कार्यक्रमांसह अनेक अभिनव उपक्रमांचे आयोजन केले आहे. या उपक्रमांमुळे सगळीकडे देशभक्तीमय वातावरण तयार होणार आहे. या अभियानात व्यापक जनसहभाग वाढण्यासाठी समाजमाध्यमांसह विविध माध्यमातून जनजागृती करावी, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. घरोघरी राष्ट्रध्वज उपलब्ध करुन द्यावा याकरिता जिल्हास्तरावर नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन द्या. राज्यातील प्रमुख धरणांसह मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, वरळी सी लिंक, गेटवे ऑफ इंडिया यासारख्या महत्वाच्या ठिकाणी तिरंग्याची रोषणाई करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. यावेळी मुख्यमंत्र्याचे अतिरीक्त मुख्य सचिव श्री.खारगे यांनी घरोघरी तिरंगा अभियानाबाबत सादरीकरण केले.

भारत देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या हृदयात भारतभूचा सार्थ अभिमान असावयास हवाच. देशाचा तिरंगा राष्ट्रध्वज उच्चस्थानी फडकत बघून आदराने मान वाकवून ध्वजवंदन करायलाच पाहिजे. हाच खरा देशप्रेमाचा, राष्ट्रभक्तीचा आणि राष्ट्रध्वज सन्मानाचा उत्तम दाखला ठरतो. मागील सन २०२२पासून संपूर्ण विश्वात भारतातील जनतेचे देशावरचे प्रेम व राष्ट्रीय ऐक्य दाखवून देण्याच्या महत्वाकांक्षेने केंद्र सरकारने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अभियानांतर्गत घरोघरी तिरंगा हा उपक्रम आयोजित केला आहे. हा निर्णय तसा देशाची आण, बाण, शान तथा मान उंचावण्याच्या उद्देशाने चांगला आहे. संपूर्ण भारतदेश तीन रंगाने शोभून जगावेगळा दृष्टीस पडत आहे, येथवर ठिक आहे. मात्र तेवढाच जनतेला राजद्रोही व देशद्रोही ठरविणाराही सिद्ध होत आहे आणि पुढेही होईलच, यात तिळमात्र शंका नाही. रोज रोटीतुकडा मागून पोटभरणाऱ्या काही लोकांना आजही राहण्यास घरे नाहीत, त्यांनी राष्ट्रध्वज उभारावीत तरी कोठे? उभारली नाहीत; म्हणून त्यांना सरकारने का राष्ट्रद्रोही ठरवावे? काही लोकांनी तिरंगा फडकविला, पुढेही फडकावतीलही, मात्र त्यांना कुठे माहित पडतं, की आपण ध्वज उलटं लावलं की सुलटं? उपक्रमाची यशस्वी सांगता झाल्यानंतर प्रत्येक घरातील ध्वज ठेवलं गेलं कुठं? पुढेही ठेवलं जावं कुठं? त्याची व्यवस्था योग्यरीत्या लावली गेली का? पुढेही लावली जाईल का? पूर्वी शौकीन व अतिव देशाभिमानी लोक मुलांच्या हातात प्लास्टिकचे ध्वज देत व नंतर दुसऱ्या दिवशी ते कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर कचरा म्हणून फेकली जात. काही ठिकाणी तसलेच चित्र दिसल्याचे समाज माध्यमांनी जगासमोर मांडले होते. अगदी तसलीच गत पुढेही होतच राहणार तर नाही ना? अशा अनेक समस्या राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यात उद्भवत आहेत, पुढेही उद्भवणार आहेतच. याच चुकांना गृहीत धरून संबंधित लोकांवर राष्ट्रध्वजाचा अवमान करणारे म्हणून गुन्हे दाखल करून त्यांना तुरूंगात डांबले गेले आणि पुढेही जाईल. याचा कोणीतरी तज्ज्ञांनी सांगोपांग विचार का केला नाही? आतातरी विचार केला जावा. मागील वर्षी अनेक किस्से उजेडात आले. राष्ट्रध्वज पुरविणारांनी ते कसेही अयोग्य ध्वज पुरविले. त्यात ते वाकडेतिकडे शिवलेले, फाटलेले, स्वप्रसिद्धीस्तव आपले नाव लिहिलेले, सही केलेले, दुसर्याच देशाचे चिन्ह लावलेले, अशा कितीतरी उणिवा किंवा भर घातलेले ध्वज होते. गडचिरोली नगरपरिषद तर्फे गडचिरोली शहरभर घरोघरी जाऊन ध्वज वाटले गेले. माझ्याकडेही ते घेऊन आले. मी ध्वज तपासून पाहिले, तेव्हा त्यात एकही ध्वज योग्य नव्हता. त्यात तिरंगी पट्ट्या असमांतर होत्या आणि अशोकचक्र केंद्रस्थानी नव्हते, तर ते कोणत्यातरी एका दिशेला अधिक सरकलेले दिसत होते; म्हणून मी एकही ध्वज पसंत करून घेतला नाही. त्या कर्मचाऱ्यांना मी फर्मावत म्हटले, कि मी असा ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाची बेईज्नती करू इच्छित नाही, त्यापेक्षा मी ध्वज न फडकावण्याच्या गुन्ह्याला सामोरे जाण्यास तयार असेन. ज्यांनी असा माझ्यासारखा विचार केला असेल ते माझ्या मते खरेच भारताचे सूज्ञ नागरिक होत. जे घरी ध्वजारोहण करू इच्छित नाही. या शुद्ध सात्विक विचाराने घरी तिरंगा न फडकावणाऱ्यांना राजद्रोही व देशद्रोही ठरविले जाऊ शकते का? घरोघरी ऐवजी चौका चौकात, मोहल्या मोहल्यात, टोल्या पाड्यात, गल्लोगल्ली किंवा गावोगावी यापैकी कोणताही पर्याय योग्य ठरला असता. कारण त्यामध्ये सामूहिक जबाबदारी राहिली असती. यासाठी सरकारने घरोघरी तिरंगा अभियानाच्या यशस्वितेसाठी पूर्वतयारी म्हणून गाव, वॉर्ड, नगर, शहर अशा प्रत्येक स्तरावर प्रशिक्षणाद्वारे ध्वजसंहिता आणि ध्वज फडकविण्याचे, हाताळण्याचे, निगा राखण्याचे नियम प्रत्येक नागरिकास अवगत करून देण्यात यावेत. घरोघरी यातील वैयक्तिक जबाबदारी राष्ट्रध्वज हाताळण्याविषयीच्या पुढील नियमांनुसार पार पाडणे खरेच अवघड आहे हो!

शासनमान्य नियम: ध्वज फडकावताना तो फाटलेला, मळलेला किंवा चुरगळलेला नसावा. तिरंगा व्यवस्थित ठिकाणी फडकवावा. ज्या उंचीवर तो फडकविला आहे, त्याच्या बरोबरीच्या उंचीवर इतर कोणताही ध्वज नसावा. कोणत्याही प्रकारच्या सजावटीत राष्ट्रध्वजाचा वापर करू नये. ध्वजारोहणासाठी झेंडा तयार करताना त्यात फुलं ठेवता येतील. ध्वज फडकविताना नारिंगी रंग वरच्या बाजूला राहील, याची दक्षता घ्यावी. ध्वजावर काहीही लिहू नये. कोणतीही वस्तू झाकण्यासाठी त्याचा वापर करू नये. राष्ट्रध्वज फरशीवर पडलेला नसावा, पाण्यावर तरंगलेला नसावा. कोणत्याही प्रकारच्या वेशभूषेवर राष्ट्रध्वजाचा वापर करू नये. तो कमरेच्या खाली गुंडाळू नये. रुमाल, सोफ्याचं कव्हर, नॅपकीन, अंतरवस्त्र यासाठी कापड म्हणून त्याचा वापर करू नये. जेव्हा ध्वज फडकावतो तेव्हा तो ध्वजस्तंभाच्या उजव्या बाजूला असावा.

एकच तारा समोर, आणिक पायतळी अंगार,
गर्जा जय जयकार क्रांतीचा गर्जा जय जयकार!

कवी कुसुमाग्रजांनी केलेल्या या आवाहनाचे सार्थक होण्यास दि.१५ ऑगस्ट १९४७चा दिवस उजाडला. पक्षी पिंजऱ्यातून उडाला. स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्या बलिदानांचे सार्थक झाले आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता–बघता स्वातंत्र्याचा प्रवास ७५ वर्षांचा होता आहे. आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. एखाद्या राष्ट्राच्या जीवनात ७५ वर्षांचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी, राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करणे अनन्यसाधारण महत्वाचे आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती? स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या? आज सत्य काय आहे? कुठे होतो आपण आणि आता कुठे आहोत? उणिवा काय राहिल्या आणि आता भविष्यात कशी पावले उचलावी लागतील? याचा विचार आपल्यालाच करावा लागेल. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपण काय कमावलं? आणि काय गमावलं? याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती आणि खनिज संपदेने समृद्ध देश आहे. माथी हिमालय उभा आहे. पायी सागराच्या लाटा लोळण घाळत आहेत. देशातून गंगा–गोदावरी, ब्रह्मपुत्रासारख्या रक्त वाहिन्या वाहत आहेत. निजीत पक्षी आकाशी भरारी मारतो आहे. सैनिक आणि जवान डोळ्यात तेल घालून देशाच्या सीमारक्षण करत आहेत. किसान लोकराजा बनला आहे. आपल्या देशाला शिमला, कुलू, मनाली, उटी सारखी समृद्ध पर्यटन स्थळे लाभली आहेत. एकूणच आपला भारतदेश सुजलाम् सुफलाम् बनला आहे. आपल्या देशाला पैराणिक आणि ऐतिहासिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक जातींचे, धर्मांचे, भाषांचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांच्यासारख्या थोर संतांची भूमी असलेल्या आपल्या देशाची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. भारत एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही अग्रेसर होत आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दर्जाची कामगिरी केली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली ७५ वर्षे साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रामध्ये नामवंत लेखक, साहित्यिक व कलावंतांनी आपला अमीट ठसा उमटवला आहे.

पण असे असले तरी एकीकडे प्रगती होत आहे आणि दुसरीकडे अनेक गोष्टी आपल्याला वेदना देत आहेत. स्वातंत्र्यासाठी अनेक शूरवीरांनी ऐन तारुण्यात बलिदान दिले. आपले संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यासाठी समर्पित केले, स्वरक्ताचा सडा टाकला. परंतु आम्ही मात्र रक्ताचा घाऊक बाजार मांडला आहे, असं कधीकधी उगीचंच वाटते. त्या देशभक्तांनी राष्ट्रध्वजास प्राणाहून प्रिय मानले व तसे वागविलेही. ते साधे जमिनीवरही पडू दिले नाही. मात्र आम्ही ते पायदळी तुडवून देशाची शान उंचावित असल्याच्या आविर्भावात वागत आहोत, हीच खरी मोठ्या शरमेची गोष्ट नाही का?आज चीन–पाकिस्तान सारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. देशांमध्ये दहशतवादी हल्ले होतात. उरी, पुलवामासारख्या रक्ताळलेल्या आठवणी आपल्याला दुःख देतात. या देशातल्या शेतकऱ्याला आपल्या हक्कांसाठी आंदोलन करावे लागते. अनेक गरिबांना एक वेळचे जेवणसुद्धा मिळत नाही. स्वर्गासारखा काश्मीर गुलाबाच्या सुगंधाने दरवळत रहाण्याऐवजी रक्तात रंगताना पाहायला मिळतो. धर्माच्या नावावरून जातीय दंगली होतात, तेव्हा स्वातंत्र्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात. भारत मातेच्या हृदयाचे शेकडों तुकडे होतात. एकाच आईची लेकरे एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतील, तर त्या आईची काय अवस्था होत असेल? या साऱ्या आक्रमणांमध्ये अतिशय सामान्य माणूस भरडला जातो. जळणारी झोपडी आणि करपणारे रक्त मात्र भारतीयच आहे, हे आपण का विसरतो? हा खरा प्रश्न आहे. भ्रष्टाचाररूपी यंत्रणेमुळे मोठी व्यवस्था पोखरली जाते. रीज मोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते, तेव्हा ज्यांच्या हाती आपण देशाची प्रशासन व्यवस्था सोपवली आहे, तेच भ्रष्टाचाराने बरबटलेले पाहून असंख्य वेदना होतात. तुरूंगात असताना अनेक गुन्हेगार निवडणुका जिंकतात. दरवर्षी मोठमोठे घोटाळे उघडकीस येतात. सामान्य माणसाच्या हक्काची भाकरी गिळंकृत करणारी मंडळी या देशाचे मारेकरी आहेत. सत्यमेव जयते! हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान आहे. परंतु अशा दृष्ट प्रवृत्तींमुळे देश शोकग्रस्त होतो. कधीकधी देशासाठी फासावर चढणारे तरुण, अवघ्या चौदाव्या वर्षी शरीरावर गोळी बार झेलणारे शिरीष कुमारसारखे तरुण पाहिले तर आजच्या या तरुण पिढीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ त्यांना कधी कळेल का? असा प्रश्न पडतो. दि.१२ मार्च २०२१पासून स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्षानिमित्त आजादी का अमृत महोत्सव या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत राज्यात विविध कार्यक्रमांच्या आयोजनास सुरुवात झालेली आहे. त्या अनुषंगाने दिनांक ११ ऑगस्ट २०२१ रोजी माननीय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आजादी का अमृत महोत्सव म्हणजेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमाच्या आयोजनाबाबत विविध मंत्रालयीन मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांच्यासमवेत बैठक संपन्न झालेली आहे. या बैठकीमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या उपक्रमांचे आयोजन देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त केंद्र शासनाने सुचित केल्यानुसार दि.१५ ऑगस्ट २०२३पर्यंत राज्यभर जनसामान्यांना सामावून घेऊन करण्याबाबत सूचना करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांनी आजादी का अमृत महोत्सव याच्या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या समितीच्या धर्तीवर राज्यातील कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी विविध क्षेत्रातील समितीला गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने आजादी का अमृत महोत्सव या अभियानासाठी शासन निर्णय दि.१३ ऑक्टोबर २०२१ रोजी बैठकीत घेतलेला आहे. त्या अनेक उपक्रमांच्या रुपात कोणाच्या सुपीक डोक्यातील भन्नाट कल्पना आहेत? माहित नाही बुवा.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपल्याला एक गोष्ट मान्यच करावी लागेल, की भारतीय स्वातंत्र्याने आपल्याला खुप काही दिले आहे. परंतु जो असमाधानाचा, असंतोषाचा सूर आणि धूर निघत आहे, त्याला आपणच जबाबदार आहोत. आपली आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक प्रगती झाली. पण...पण मूल्यांचा ऱ्हास होत गेला. म्हणूनच एकीकडे आपण वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गाने झपाट्याने परिवर्तन करीत आहोत. परंतु त्याचवेळी दुसऱ्या बाजूने वेगाने वाढणाऱ्या भौतिक व अभौतिक समस्यांच्या दृष्ट विळख्यात आपण अडकल्याने स्वातंत्र्याचा श्वास गुदमरतोय. अशीच अवस्था पुढेही होऊ नये, म्हणूनच स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षानिमित राबविण्यात येणाऱ्या अभियानात सूज्ञ नागरिक बनून सावधपणे पावले टाकावीत. घरोघरी तिरंगा प्रत्येकानी उभारला पाहिजे, मात्र तत्पूर्वी त्या देशभक्ताने राष्ट्रध्वज संहिता व नियम आत्मसात केले पाहिजे. कारण तिरंगा हाताळणे माझ्यासारख्या ऐऱ्यागैऱ्याचे काम नाहीच! !! स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सर्वांना वंदे मातरम् !!

*********

– एक सामान्य नागरिक –
श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.
(वैभवशाली भारताच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक)
रामनगर, गडचिरोली,
फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.

# काँग्रेसने विधानसभेचे रणशिंग लातूरमधून फुंकले महाराष्ट्राच्या विधानभवनावर 'मविआ'चा झेंडा फडकणार काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्रचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला विश्वास






'मविआ'चा मुख्यमंत्र्याचा चेहरा सामान्य माणुस यावेळी बोलताना आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्र्याचा चेहरा हा समान्य माणुस असल्याचे नमुद करुन महाविकास आघाडीकडून मराठवाड्याच्या खुप अपेक्षा आहेत आणि तो त्यांचा अधिकारही आहे काँग्रेसच्या नेत्यांनी मराठवाड्याच्या मागसलेपणाचा लेबल पूसून टाकण्यासाठी खुप कार्य केले सिंचन, दळणवळ, उद्योग, कृषी, शिक्षण, आरोग्य या क्षेत्राच्या विकासासाठी नेत्यांनी परिश्रम घेतले विलासराव देशमुख यांनी अडचण अंगावर घेऊन त्यातून मार्ग काढले त्यांनी मांजरा, रेणा आदी नद्यांवर बराजची शृंखला उभी केली आज धरणापेक्षा अधिक पाणीसाठा बराजमध्ये आहे महात्मा गांधी यांनी देश लुटणाजया ब्रिटीशांना चले जाओचा नारा दिला होता ब्रिटीश गेले परंतू, आजही देश लुटला जात आहे त्यामुळे आता 'बापू लढेथे गोरोंसे, हम लढेंगे चोरोंसे', असा नारा आमदार धिरज देशमुख यांनी दिला.
प्रारंभी शंखनाद करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली पाहूण्यांचे स्वागत माजी मंत्री आमदार अमित देशमुख, आमदार धिरज देशमुख, श्रीशैल उटगे, अड़ किरण जाधव, अशोक पाटील निलंगेकर, अभय साळुंके, गोरोबा लोखंडे, शीलाताई पाटील, स्मिता खानापूरे, अड़ प्रमोद जाधव, कल्याण पाटील, सिराज जहागीरदार, अड़ फारुक शेख, दीपक सुळ, एकनाथ पाटील, अनिल चव्हाण, अकबर माडजे, इम्रान सय्यद, प्रविण कांबळे, प्रविण बिरादार यांनी केले. कार्यक्रमास विदया पाटील, अमर खानापूरे, संभाजी सुळ, प्रिती भोसले, उषा कांबळे, बाबासाहेब गायकवाड, दिपक राठोड आदीसह काँगेस पक्षाचे लातूर, धाराशीव, बीड येथील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व्यंकटेश पुरी, सुपर्ण जगताप, प्रविण सुर्यवंशी यांनी केले तर श्रीशैल उटगे यांनी आभार मानले.

लातूर /प्रतिनिधी :– नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने मतदारांचा विश्वास प्राप्त करीत भरघोष यश मिळवले मराठवाड्यात काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला महाराष्ट्रातील भाजपा महायुतीचे सरकारर हे ६० टक्के कमिशन घेणारे सरकार आहे शेतकरी, शेतमजूर, दलित, अल्पसंख्यांक, बेरोजगार युवक, महिलांचे प्रश्न या सरकारने सोडवले नाही उलट भ्रष्टाचाराने महाराष्ट्र पोखरुन काढला त्यामुळे महाराष्ट्रात आता परिवर्तनाची लाट आली असून येत्या विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्राच्या विधानभवनावर महाविकास आघाडीचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्रचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला. लोकसभेच्या यशानंतर काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केले आहे. या अनुषंगाने पक्षाच्या वतीने विभागवार आढावा बैठका घेऊन २० ऑगस्ट रोजी मुंबई येथे विधानसभा निवडणुक प्रचाराचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यातील पहिली विभागीय आढाव बैठक दि १० ऑगस्ट रोजी लातूर येथे झाली बैठकी दरम्यान येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर लातूर, धाराशिव, बीड या तीन जिल्ह्यांच्या झालेल्या विजय संकल्प मेळाव्यात काँग्रेस पक्षाचे प्रभारी रमेश चेन्नीथला बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी मंत्री दिलीपराव देशमूख होते. या मेळाव्यास काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस पक्षाचे विधान परिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, मधुकरराव चव्हाण, अशोक पाटील, अनिल पटेल, माजी आमदार वैजनाथ शिंदे, माजी आमदार अड़ त्र्यंबक भिसे, युवक काँग्रेसचे कुणाल राऊत, नानाभाऊ गावंडे, डॉ वजाहत मिर्झा, रामहरी रुपनवर, अशोकराव पाटील निलंगेकर, जगदीश बावणे, धिरज पाटील, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी महापौर अड़ दीपक सुळ, जितेंद्र देहाडे, रवी काळे, विजय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यात नांदेडचे नूतन खासदार वसंतराव चव्हाण, लातूरचे खासदार डॉ शिवाजी काळगे, जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. लोकसभेच्या निवडणुकीत उमेदवारी देताना काँग्रेस पक्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अभिप्रेत असलेल्या सामाजिक न्यायालया प्राधान्य दिले, असे नमुद करुन रमेश चेन्नीथला पुढे म्हणाले, लोकसभेच्या यशाची प्रेरणा घेऊन काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विधानसभेच्या निवडणुकीसाठी मैदानात उतरावे राज्यातील काँग्रेसमध्ये कसलेही मतभेद नाहीत आम्ही सर्वजण एकदिलाने काम करीत आहोत या उलट सत्ताधाजयांमध्ये कुरघोडी सुरु आहे विकासरत्न विलासराव देशमुख यांनी दिलेला विकासाचा मंत्र घेऊन जनतेपर्यंत जा काँग्रेस पक्षाचा विचार घराघरापर्यंत पोहोचवा, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्यात व केंद्रात भाजपाचे सरकार असताना आरक्षण देण्यापासून त्यांना कोणी थांबवले

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, महायुती सरकारवर भाजपा वर आरएसएसचा कंट्रोल आहे, एकनाथ शिंदे हे केवळ मुखवटा आहेत. मराठा आरक्षण प्रश्नी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुलाल उधळला पण त्यांनी हा गुलाल का उधळला हे जाहीर केले नाही. जरांगे पाटील व त्यांच्यात काय बोलणी झाली हे आम्हाला माहित नाही. सर्व पाप सरकारने करायचे आणि खापर विरोधी पक्षावर फोडायचे हा त्यांचा अजेंडा आहे. राज्यात व केंद्रात भाजपाचे सरकार असताना आरक्षण देण्यापासून त्यांना कोणी थांबवले, असा प्रश्न विचारून त्यांना आरक्षण द्यायचे नाही तर दोन्ही समाजात भाडंणे लावायची आहेत. फोडा व राज्य करा या ब्रिटीश नितीचा वापर भाजपा करत आहे. मनुवादी व्यवस्था हवी की शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार हवा याचा विचार जनतेने करायचा आहे. लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात महायुतीने एक जागा जिकली पण विधानसभा निवडणुकीला मात्र मराठवाड्यातून महायुतीचा सुपडासाफ करा. विधानसभा निवडणुकीत मविआ १८५ पेक्षा जास्त जागा जिकेल व राज्यात काँग्रेस हाच सर्वात मोठा पक्ष असेल. काँग्रेस मविआचे सरकार सत्तेत आल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही घेतल्या जातील असे नाना पटोले म्हणाले.

अमित देशमुख यांच्यावर आता मराठवाड्याची जबाबदारी

लोकसभेच्या निवडणुकीपासून महाराष्ट्रात काँग्रेसचा झंजावात निर्माण झाला आहे. यातुन आता विधानसभेच्या निवडणुकीतही काँग्रेसला मोठे यश मिळावे लागेल. लोकसभेच्या निवडणुकीत मराठवाड्यातील काँग्रेस पक्षाने १०० टक्के यश मिळवले त्यामुळे आता माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यावर आता फक्त लातूर जिल्ह्याची नव्हे तर संपूर्ण मराठवाड्याची जबाबदारी आहे राज्यातही त्यांना जावे लागेल, असे यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले.
पुढे बोलतांना ते म्हणाले भाजपाला सत्तेचा अहंकार होता लोकसभेच्या निवडणुकीत जनतेने त्यांचा अहंकार उतरवला राज्यातील महायुतीचे सरकार भ्रष्टाचाजयांचे आहे बहीण लाडकी नाही तर सत्ता लाडकी आहे गेल्या सहा महिन्यांपासून निराधारांच्या पगारी झालेल्या नाहीत अनेक अनुदाने रखडली आहेत निधी अभावी अनेक विकास योजना थांबल्या आहेत राज्याची विकास प्रक्रिया थांबली आहे असे असताना केवळ मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचे गुणगाण चालले आहे.
विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या आठवणींना उजाळा देताना बाळासाहेब थोरात म्हणाले, काँग्रेस पक्षाचे नेते विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या कायम प्रेरणा मिळते विलासरावजी आज आपल्यात नाहीत परंतू, त्यांची आजवरची भाषणे काँग्रेसचा प्रचार करीत आहेत दिलीपरावजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली अमित देशमुख व धिरज देशमुख यांनी लोकसभेत पक्षाला मोठे यश मिळवून दिले.

महायुती सरकार ही लुटारांची टोळी

विजय वडेट्टीवार

यावेळी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात महिला असुरक्षित आहेत, १५ हजार मुली, महिला बेपत्ता आहेत आणि मतासाठी नवीन योजना आणून दिशाभूल करत आहेत. महिलांना १५०० देऊन ३ हजाराचा खिसा कापतील, अशा सरकारपासून सावध रहा. काँग्रेस आघाडीचे सरकार असताना महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात आघाडीवर होता पण महायुती सरकारच्या काळात आता महाराष्ट्र मागे पडला असून गुजरात पुढे गेला आहे. राज्यातील महायुती सरकार ही लुटारांची टोळी आहे. भ्रष्टाचार्यांच्या हातात सरकारच्या तिजोरीच्या चाव्या आहेत. तिजोरी साफ करणारे हे सरकार घालवा आणि काँग्रेसचा तिरंगा विधानसभेवर फडकवा, असे आवाहन वडेट्टीवार यांनी केले

राज्यात 'मविआ'ची सत्ता आणल्याशिवाय स्वस्त बसणार नाही

राज्यात महायुतीच्या सरकारने प्रचंड भ्रष्टाचार केला आहे त्यामुळे महाराष्ट्राचे खुप मोठे नुकसान झाले आहे, महायुतीच्या सत्ताधाजयांनी महाराष्ट्र लुटून खालला आहे आता यांचे दिवस भरले आहेत त्यामुळे राज्यात महाआघाडीची सत्ता आणल्याशिवाय स्वस्त बसणार नाही, असे नमुद करुन सतेज पाटील पुढे म्हणाले, लोकसभेत १०० टक्के रिझल्ट देणारे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी अता आमदार निवडून आणण्याची जबाबदारी घ्यावी ज्या भुमिने विलासराव देशमुख यांना राज्यभर फिरण्याची मुभा दिली तशी मुभा अमित देशमुख यांना लातूरच्या मतदारांनी द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

न्यायाच्या लढाईत जिंकलो सत्तेच्या लढाईत कमी पडलो

अध्यक्षीय समारोप करताना माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले, नुकतीच झालेली लोकसभा निवडणुक वार ऑफ जस्टीस होती त्यात इंडिया आघाडीला यश मिळाले पण सत्तेपर्यंत जाता आले नाही न्यायाच्या लढाईत जिंकलो सत्तेच्या लढाईत कमी पडलो येणाजया निवडणुकीत नववा उत्साहाने सामारे जायचे आहे सर्वेवर अवलंबुन न राहात जनतेपर्यंत पोहोचावे आताचे सत्ताधारी झुंडशाही पद्धतीने काम करीत आहेत त्यमुळे विकासाची घडी विस्कटली विस्कटलेली विकासाची ही घडी महाविकास आघाडीच बसवेल आरक्षणाविषयी बोलताना ते म्हणाले, आरक्षणाची मर्यादा ७० टक्क्यांपर्यंत वाढवून हा प्रश्न सोडवावा मात्र प्रश्न सुटले तर समाजातील वाद मिटेल पण भाजपाला हा वादच मिटवायचा नाही लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकने एक पैसाही न घेता महिलांचे २१०० बँक खाते काढून साडे तीनशे कोटी रुपयांची महिलांचीबचत करुन पहिली ओवाळणी दिली असल्याचेही ते म्हणाले.

'मविआ'च्या जागा वाटपात मराठवाडासह लातूर जिल्ह्याला अधिकाधिक जागा मिळाव्यात

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीमध्ये जेव्हा जागा वाटप होतील तेव्हा जागा वाटपात लातूर जिल्ह्याला अधिकाधिक जागा मिळाव्यात, असे नमुद करुन यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले, उदगीरची जागा राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे आहेत परंतू, स्थानिक स्वराज्य संस्थांचे जाळे काँग्रेस पक्षाचे आहे त्यामुळे उदगीरची जागा काँग्रेस पक्षाला सोडवून घ्यावी पक्षाच्या श्रेष्ठींनी कार्यकर्त्यांचे पालकत्व स्वीकारुन कार्यकर्त्याना न्याय द्यावा. लोकसभेत महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यात काँग्रेस पक्षाला मिळालेले यश सुवर्ण अक्षरात लिहावे, असे आहे. काँग्रेसच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी, खासदार राहूल गांधी, प्रियंका गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, रमेश चेन्नीथला, नानाभाऊ पटोले, बाळासाहेब थोरात या सर्व नेत्यांमुळे यश मिळवला आले. सत्ताधाजयांनी महाराष्ट्रातील घरे फोडण्याचे काम केले मराठवाड्यातही तेच केले सत्ताधाजयांची नियत फिरली आणि त्यांनी 'देवघर' ही फोडले परंतू, देवघरातला 'देव' आपल्यासोबत आहे. या कार्यक्रमासाठी काँग्रेसचे नेते शिवराज पाटील चाकुरकर यांना अग्रहाची विनंत केली पण त्यांनी काही अडचणी बोलून दाखवल्या खरे तर विलासराव देशमुख यांना शिवराज पाटील चाकुरकर यांनीच राजकारणत आणले शंकरराव चव्हाणांनी विलासराव देशमुख यांना मोठे केले काँग्रेसची परंपरा, काँग्रेसची संस्कृती जोपासण्याचे काम लातूरच्या काँग्रेस जणांनी केले त्यांना सलाम राज्यात महायुतीकडून लुट सुरु आहे ६० टक्क्यांचे सरकार आहे महाराष्ट्र भ्रष्टाचारमुक्त काँग्रेसच्याच नेतृत्वाखाली होऊ शकतो महाराष्ट्राच्या विधानभवनावर तिरंगा फडकविण्याकरीता सर्वांनी सज्ञ व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

पक्षाला मिळालेला विजय काँग्रेस विचार जपणाऱ्या सामान्य जनतेमुळे

पक्षाला मिळालेला विजय हा केवळ आणि केवळ काँग्रेस विचार जपणाऱ्या सामान्य जनतेमुळे मिळाला असल्याचे नमूद करून त्या जनतेला आपण वंदन करत असल्याचे यांप्रसंगी बोलताना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख सांगितले. या जनतेचा भक्कम पाठिंबा आणि आशीर्वाद यापुढे मिळत राहील असा विश्वासही यावेळी माजी मंत्री अमित देशमुख यांनी व्यक्त केला.

# लढा बिकट वाटत असला तरी पार पाडण्याची जबाबदारी आपलेपणाच्या नात्याने स्विकारा_ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ५९ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– समाज जीवनात कार्यरत बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, १४ आगष्ट १९३१ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, लढा बिकट वाटत असला तरी पार पाडण्याची जबाबदारी आपलेपणाच्या नात्याने स्विकारा. तसेच ५ आगष्ट १९४६ ला म्हटले होते की, हक्क मिळविण्यासाठी आपला लढा चालूच राहील. या दोन्ही विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन ( आईना) च्या संयुक्त विद्यमाने ५९ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ४ आगष्ट २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या कार्यालयात आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना भारतीय जन संघर्ष सेनेचे अध्यक्ष सुशील भिसे म्हणाले की, प्रशिक्षित कार्यकर्ते निर्माण होईपर्यंत पुढे जाणे शक्य नाही. करिता कैडर्स बेस कार्यकर्ते तैयार केले पाहिजे. जे कार्य फुले शाहू आंबेडकरांईट स्टडी सर्कल मार्फत सातत्याने सुरु आहे. प्रस्थापित पक्ष बहुजन मुस्लिमांना मतासाठी गृहीत धरतात. आपण आपल्या विचारधारेला रुजवायला कमी पडत असल्याने प्रस्थापित प्रबळ ठरत आहेत. करिता आपण आपल्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविली पाहिजे.

यांप्रसंगी अनिल खरतडे म्हणाले की, चळवळ यशस्वी करण्यासाठी एकत्रित लढने आवश्यक आहे. धर्मांतरित बौद्ध एकसंघ नसल्याने ते शक्य होत नाही. न्यायमूर्ती बी. आर. गवई सारखी माणसे कु–हाडिचा दांडा गोतास काळ ठरत आहेत. राजू मगरे म्हणाले की, चुकीच्या नेतृत्वावर विश्वास ठेवल्याने ते जनतेला दिशाहीन करून विश्वासघात करतात. तडजोड करून का होईना सत्तेपर्यंत पोहोचले पाहिजे. सुभाष वानखेडे म्हणाले की, आरक्षण वाद्यांचे नुकसान केवळ भाजपच करतो असे नाही तर काँग्रेस सुद्धा जास्त दोषी आहे. ओबीसींना ओबीसींचा अर्थच कळत नसल्याने ते चळवळीपासून कोसो दूर आहेत. महादेव डांबरे म्हणाले की, आपण जरी बहुसंख्येने असलो तरी पुढे घेऊन जाणारे सक्षम नेतृत्व, कमांडर नसल्याने अल्पसंख्याक आपल्या छाताडावर बसून राज्य करीत आहेत. सुनिल बोराडे म्हणाले की, समाजातील उच्च पदस्थ अधिकारी सामान्य जनतेच्या वस्तीत जात नाहीत.

प्रमुख वक्ते एड. विलास रामटेके म्हणाले की, चळवळीतील पुढा–यांवर करडी नजर ठेवली पाहिजे. तसेच जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्य भाग बुडाला. एवढे स्पष्ट केलेले असताना सुद्धा आपली माणसं शत्रूच्या टाचेखाली गुलामाप्रमाणे का काम करतात? बहुजन समाजातील नेतृत्वाचे दखलपात्र कार्य होत नसल्याने इतर त्यांची दखल घेत नसतात. आरक्षण हे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय असलेल्यांना दिले असल्याने आर्थिक आधार घेऊन क्रिमी लेअरची अट लागू करणे असंवैधानिक आहे. भाजपचे सुब्रमण्यम स्वामी आरक्षण निष्प्रभ करणे ही त्यांची प्राथमिकता आहे, असे म्हटले होते. त्याची पूर्तता करण्यासाठी ते संवैधानिक संस्थाचा गैरवापर करून अंमलबजावणी करीत आहेत. एका काळात बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांसाठी काय केले? असा प्रश्न ग्रंथ रुपात विचारला होता. वर्तमानात आपण काँग्रेस, बीजेपी सारख्या शासनकर्त्यांनी सर्व संवैधानिक समूहाच्या उत्थानासाठी काय केले आहे?अशा प्रश्नाचे विश्लेषण संदर्भासहीत जनतेसमोर मांडले पाहिजे. करिता प्रासंगिकता लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ आगष्ट १९३१ ला कोटा येथे म्हटल्याप्रमाणे लढा बिकट वाटत असला तरी पार पाडण्याची जबाबदारी आपलेपणाच्या नात्याने स्विकारा तसेच ५ आगष्ट १९४६ ला पुणे येथील सभेत म्हटल्याप्माणे हक्क मिळविण्यासाठी आपला लढा चालूच ठेवला पाहिजे म्हणून त्या विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त हा विषय चर्चेला घेण्यात आला आहे.



काँग्रेस व भाजपा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यातील एक छुपा तर दुसरा दृश्य शत्रू आहे. म्हणून दगडापेक्षा वीट मऊ असे म्हणून स्वीकारणे हानिकारक ठरेल.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी स्टडी सर्कलच्या बातम्यां प्रकाशित केल्या आहेत. मूलनिवासी बहुजन समाजातील राजकीय पक्ष अस्तित्वहीन होणे हे सामाजिक चळवळीच्या अध:पतनाचे परिणाम आहेत. म्हणून बाबासाहेब म्हणाले होते की,

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. मंगला झिने यांनी केले. या कार्यशाळेला सुनिल बोराडे, सुशील भिसे, महादेव डांबरे, सुभाष वानखेडे, अरुण इंगळे, राजू मगरे, अनिल खरतडे, साधू आनंद, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे एड. विलास रामटेके यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# महिलांमध्ये थायरॉईड झाल्यानंतर कोणती लक्षणे दिसतात?



सर्वच महिलांमध्ये थायरॉईड हा आजार आढळून येतो. पुरुषांपेक्षा जास्त महिला थायरॉईड सारख्या गंभीर आजाराने त्रस्त आहेत. हा आजार शरीरातील हार्मोनल असंतुलित झाल्यानंतर उद्भवतो. घशामध्ये थायरॉईड ग्रंथी असते, जी हार्मोन्स तयार करण्यासाठी मदत करते. पण काही कारणांमुळे शरीरातील अंतःस्रावी ग्रंथीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्यास सुरुवात होते आणि हार्मोनल असंतुलित होऊन जातात.यामुळे थायरॉईड हा आजार होतो. थायरॉईड झाल्यानंतर आरोग्यसंबंधित अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. थायरॉईड झाल्यानंतर शरीरामध्ये अनेक छोटे छोटे बदल घडून येतात. हे बदल पुढे जाऊन मोठे होण्याची शक्यता असते. त्यामुळे योग्य वेळी थायरॉइडवर लक्ष दिले नाही तर गंभीर आजार होऊ शकतात.आज आम्ही तुम्हाला थायरॉईडचे नेमकी किती प्रकार आहेत? शरीरात कोणती लक्षणे दिसून येतात? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. थायरॉइडचे प्रकार: थायरॉईडचे दोन प्रकार आहेत. त्यातील एक म्हणजे 'हायपरथायरॉईडीझम' आणि 'हायपोथायरॉईडीझम' थायरॉईडची लक्षणे: वजन कमी होणे केस गळणे मासिक पाळीमध्ये अडथळा निर्माण होणे सतत मूड स्विंग होणे स्नायू आणि सांधेदुखी शरीरामध्ये सतत थंडावा उष्णता जाणवणे मानेला किंवा घश्याला सूज येणे थायरॉईड नियंत्रणात ठेवण्यासाठी 'या' टिप्स फॉलो करा: वाढलेला थायरॉईड नियंत्रणात ठेवण्यासाठी आहारात आयोडीन, जस्त, जीवनसत्त्व –डी,जीवनसत्त्व –बी, मॅग्नेशियम आणि सेलेनियम यांसारख्या पोषक घटकांचा आहारात समावेश करा. थायरॉईड नियंत्रणात ठेवण्यासाठी आहारात सफरचंद, विटामिन सी युक्त पदार्थांचे सेवन करा.तसेच ब्राऊन राइस थायरॉईड कमी करण्याचे काम करतो. थायरॉईड असलेल्या लोकांनी गहू किंवा बेकरी पदार्थांचा आहारात समावेश करू नये. यामुळे हा आजार आणखीन वाढू लागतो. बदाम, अक्रोड आणि ब्राझील नट्स थायरॉईडसाठी योग्य आहेत. त्यामुळे या पदार्थांचा तुम्ही आहारात समावेश करू शकता.

# घरफोडीच्या गुन्ह्यातील अट्टल गुन्हेगाराला सोन्याच्या दागिन्यासह चार दिवसात आरोपीला अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :- घरफोडीच्या गुन्ह्यातील अट्टल गुन्हेगाराला सोन्याच्या दागिन्यासह ७८ हजार रुपयाच्या मुद्देमालासह अवघ्या चार दिवसात घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीला अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.*

याबाबत थोडक्यात माहिती की, लातूर जिल्ह्यातील मुरुड पोलीस ठाणे हद्दी मध्ये रात्रीच्यावेळी राहते घरचे खिडकी च्या ग्रील कटरने कापून घरामध्ये प्रवेश करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी झाल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे मुरुड येथे अज्ञात आरोपी विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता .

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून नमूद गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता सदर पथकाला त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना आल्या होत्या.

सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून खिडकीचे ग्रील कापून घरफोडी करणाऱ्या करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली.

नमूद घरफोडीतील गुन्हेगार त्याने चोरलेला सोन्याचा मुद्देमाल विकण्यासाठी मुरुड मधील जनावराच्या बाजाराजवळ येणार असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीची खातरजमा करून सदरचे पथक तात्काळ नमूद परिसरात सापळा लावून संशयित आरोपीला ताब्यात घेतले.



सदर पथकांनी अतिशय कुशलतेने सापळा लावून घरफोडीच्या गुन्ह्यातील संशयित आरोपीला दिनांक ०९/०८/२०२४ रोजी ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव आबा आप्पा शिंदे, वय २८ वर्ष, राहणार मोहा तालुका कळंब जिल्हा धाराशिव. सध्या राहणार गोवर्धनवाडी, ढोकी पाणी प्लांट च्या पाठीमागे जिल्हा धाराशिव असे असल्याचे सांगितले.

त्याची झडती घेतली असता त्याच्या पॅन्ट च्या खिशामध्ये त्यामध्ये सोन्या चे दागिने मिळून आले.त्याबाबत त्याच्याकडे विचारले तेव्हा त्याने त्याच्या इतर साथीदारासह मिळून चार दिवसापूर्वी मुरुड तालुक्यातील एका घराचे खिडकीचे गज कापून घरफोडी, गुन्हा केल्याचे व त्या गुन्ह्या मध्ये चोरलेला,त्याच्या हिश्याला आलेले सोन्याच्या दागिन्याचा मुद्देमाल असल्याचे कबूल केले

त्यावरून नमूद आरोपीस त्याने चोरलेल्या सोन्याचे दागिने, व गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल असा एकूण ७८ हजार २२५ रुपयाचा मुद्देमालासह ताब्यात घेऊन पुढील कारवाई करिता पोलीस ठाणे मुरुड यांचे ताब्यात देण्यात आले आहे. असून त्याच्या सोबत इतर आरोपी साथीदारांचा शोध सुरू आहे.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून घराचे खिडकीचे ग्रील कापून चोरीचा गुन्हा करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळून त्यांच्याकडून चोरलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरचा गुन्हेगार हा सराईत असून वरिष्ठांच्या मार्गदर्शनात अतिशय कुशलतेने व माहितीचे संकलन करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमूद आरोपींला ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उप-निरीक्षक संजय भोसले,सहाय्यक पोलीस निरीक्षक अमितकुमार पुणेकर, पोलीस अमलदार रामहरी भोसले, सिद्धेश्वर जाधव, सुधीर कोळसुरे, योगेश गायकवाड, प्रकाश भोसले, धनंजय गुट्टे, सुहास जाधव,पोलीस चालक अमलदार चंद्रकांत केंद्रे यांनी केली आहे.

# विधानसभा प्रमुखपदी बाबुराव केंद्रे



किनवट/शेख शौकत :-आगामी विधानसभा निवडणुकीचे अनुषंगाने भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आविसी आघाडीचे जिलाध्यक्ष बाबुराव केंद्रे यांची किनवट, माहुर विधानसभा निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. होऊ घातलेल्या विधानससभा निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने किनवट मतदार संघात जोरदार तयारी सुरू केली आहे. त्यानुसार पक्षलेखनी ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाबुराव केंद्र यांची किनवट / माहुर विधानसभा निवडणूक प्रमुख पदी नियुक्ती केली आहे. दि ७ ऑगस्ट रोजी किनवट येथील पक्षाच्या लोकार्पण जनसंपर्क कार्यालना जिल्हामा किशार देशमुख यांच्या हस्ते व आ. भीमराव केराम मांच्या प्रमुख उपस्थित त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. भाजपा तालुध्यक्ष श्रीकांत घाडेकर, ॲड दिनेश येऊतकर, नगरसेवक गोषु महामुने, भाजपा तालुका सरचिटणीस अर्चना राजु दराडे, बिग एल कांगणे, विभिषण पाळवदे, नारायण दराडे, नंदकुमार जाशी, अनिल बाघमारे, नंदु कोलपवार, संतोष तामखाने आदींनी या नियुक्तीचे अभिनंदन केले आहे.

# दलित हत्याकांडाचा विरोधात भीमसैनिकांनी दिले नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना निवेदन.



लातूर : लातूर जिल्ह्यातील दलित हत्याकांडांच्या घटनांमधील आरोपींविरुद्ध खूनाचे व अट्रोसिटीचे गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी तसेच सीआयडी मार्फत चौकशी करून सदरील खटले फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीना फाशीची शिक्षा देण्यात यावी व मयत दलित युवक, विद्याथ व अत्याचारीत युवकांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा, आदी मागण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी भीमसैनिकांच्या शिष्टमंडळाने नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना देण्यात आले. याप्रसंगी उपस्थित दलित नेत्यांनी दलित हत्याकांड व अत्याचाराच्या विरोधात पोलीस प्रशासनाने याबाबत तात्काळ दखल घ्यावी, अन्यथा लवकरच अर्ध नग्न मोर्चा काढण्याचा इशाराही दिला आहे.

निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात , रिपाइं आठवले पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव चंद्रकांत चिकटे, नांदेड येथील रिपाइं चे महाराष्ट्र प्रदेश संघटक विजयदादा सोनवणे, भिमशक्तीचे मोहन माने, प्रा. अनंत लांडगे, अँड .अतिश चिकटे,मराठवाडा सचिव अशोक कांबळे,वंचित बहुजन आघाडीचे सचिन गायकवाड,युथ पँथर संघटनेचे संतोष वाघमारे,काँग्रेसचे यशपाल कांबळे,प्रताप कांबळे, राहुल कांबळे,ब्लू पँथर संघटनेचे साधू गायकवाड, रिपाइं (आठवले )पक्षाचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष मिलिंद शिराढोनकर, मराठवाडा उपाध्यक्ष तथा नांदेड लोकसभा अध्यक्ष सुखदेव चिखलीकर , नांदेड जिल्हा कार्याध्यक्ष सचिन सांगवीकर, नांदेड शहर सरचिटणीस प्रतिक सोनवणे, नांदेड जिल्हा सचिव रामा चिंतोरे, आदींसह तिन्ही पिडीत कुटुंबाचे नातेवाईक वविविध पक्ष -संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर शहर व जिल्ह्यात मागील दोन महिन्यांपासून विविध ठिकाणी दलित समाजातील युवक, विद्यार्थ्यांना जातीयद्वेषातून लक्ष्य केले जात असून त्यांच्या अमानुषपणे हत्या करण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर अत्याचाराच्या घटनांमध्येही वाढ झालेली आहे. प्रामुख्याने लातूर शहरातील एमआयडीसी भागातील जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या राजमाता जिजाऊ वसतीगृहात इयत्ता सातवीच्या वर्गात शिकणाऱ्या बौद्ध समाजातील अरविंद राजाभाऊ खोपे या १३ वर्षीय विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू झालेला आहे. चाकूर तालुक्यातील नायगाव येथील कु. सायली सिद्धार्थ गायकवाड हिचा नांदेड रोडवरील एका मुलीच्या वस्तीगृहात बलात्कार करून खून करण्यात आलेला आहे. उदगीर पोलिस ठाणे अंतर्गत देवणी येथे सचिन शिवाजी सूर्यवंशी या युवकाचाही जातीय मानसिकतेतून खून करण्यात आला. या सर्व घटनांमधील सर्व आरोपींविरुद्ध खूनाचे व ट्रोसिटीचे गुन्हे दाखल करून सीआयडी मार्फत चौकशी करावी. तसेच सदर प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. आदी प्रमुख मागण्यांचा समावेश सदरच्या निवेदनात करण्यात आलेला आहे. शासन व पोलिस प्रशासनाने मागण्यांबाबत दखल नाही घेतल्यास लवकरच अर्धनग्न आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

# रस्त्यातील खड्डयात बेशरमाचे झाड लावून लातुरात शहर जिल्हा भाजपचे आंदोलन : आमदारांना जाग येण्यासाठी हे आंदोलन : देविदास काळे



लातूर : लातूर शहरातील स्व. विलासराव देशमुख मार्ग आणि शिवनेरी गेट ते रमा टॉकीज ते गांधी चौक मार्ग हे दोन प्रमुख मार्गाचे काम मागील चार वर्षांपासून रखडलेले असून नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे स्थानिक आमदारांना जाग येण्यासाठी आज १० ऑगस्ट रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांच्या नेतृत्वाखाली स्व. विलासराव देशमुख मार्ग व शिवनेरी गेट ते गांधी चौक मार्गावरील खड्ड्यामध्ये बेशरमाचे झाड लावून निदर्शने आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रशासन व स्थानिक आमदाराविरुद्ध प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. गेली १० वर्षाच्या कार्यकाळात काँग्रेसच्या आमदारांना लातूरच्या समस्यांचे, अडचणीचे काही देणे घेणे नाही आणि निवडणूक आली की मतदान मागायला बाहेर पडतात. शहरातील स्व. विलासराव देशमुख मार्ग मागील चार वर्षांपासून रखडलेला आहे. त्यामुळे आतापर्यंत या खराब व अर्धवट रस्त्यावर चार नागरिकांचा बळी गेलेला आहे. त्यामुळे आमदारांच्या निष्क्रियपणाचा निषेध म्हणून आज भाजपच्या वतीने रस्त्यातील खड्ड्यात आम्ही बेशरमाचे झाड लावून आंदोलन केले. सदर दोन्ही रस्त्याचे काम लवकर पूर्ण नाही केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी दिला आहे. तसेच सदर दोन्ही रस्त्याच्या कामाबरोबरच लातूर शहरातील सर्वच विकासकामे आमदार आणि प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनमुळे प्रलंबित आहेत. त्यामुळे लातूर शहरातील नागरिकांना अनेक समस्याना तोंड द्यावे लागत आहे. अशी टीका भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ॲड. गणेश गोमचळे यांनी केली. या आंदोलनात भाजपचे ॲड. दिग्विजय काथवटे, रवि सुडे, ॲड. प्रदीप मोरे, गणेश हेड्डा, संजय गीर, ॲड. ललित तोष्णीवाल, निखील गायकवाड, ॲड. गणेश गोजमगुंडे, आबा चौगूले, विशाल हवा पाटील, गणेश गवारे, प्रमोद गुडे, विनय जाकते, पपू धोत्रे, गोविंद सूर्यवंशी, संतोष तिवारी, अबेद अली सय्यद, गजेंद्र बोकन, राहुल भूतडा, बालाजी मार्कडे, शशिकांत हांडे, दुर्गेश चव्हाण, राजेश सोनवणे, पंकज शिंदे, अरुण जाधव, नवनाथ ढेकरे, गाडेकर आदीसह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते.

# राज्य परिचारिका संघटना व महाराष्ट्र असोशिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स यांच्या वतीने शहरातील बौद्धिक दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण



लातूर :- महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना व महाराष्ट्र असोशिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स यांच्या वतीने शहरातील बौद्धिक दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण. दि ०७ ऑगस्ट २४ रोजी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर, येथे बौद्धिक दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य स्कूल बॅग, वह्या, पेन पेन्सिल इत्यादी साहित्याचे वितरण करण्यात आले. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसर लातूर येथील परिसरात असलेल्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने नियमितपणे बौद्धिक दिव्यांग मुले/मुली, व्यक्तीसाठी आरोग्यविषयक शिबिरे, विविध उपचारपद्धती, दिव्यांगासाठी उपयुक्त साहित्य, उपलब्ध करून दिली जातात. आज याच केंद्राच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा लातूर व महाराष्ट्र असोशिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स यांच्या वतीने लातूर शहरातील बौद्धिक दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक सा कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री बस्वराज पैके यांनी केले हित्य वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री बस्वराज पैके यांनी केले. यावेळी मार्ड संघटनेचे सचिव- श्री नयन काब्रा, सहसचिव- श्री सुशांत देशमुख, खजिनदार- श्री अनंत चव्हाण तसेच महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर संघटनेच्या राज्यसरचिटणीस- श्रीमती सुमित्रा तोटे, दिव्यांगाप्रती सदैव संवेदनशील दिव्यांग कर्मचारी वरिष्ठ मनोरुग्ण तज्ञ - श्री योगेश वाघ, सहखजिनदार- श्री दीपक शिंदे, सदस्य श्रीमती बिस्मिल्ला शेख, उत्सव समिती उपाध्यक्ष श्रीमती मीना दैवज्ञ, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे समन्वयक श्री बस्वराज पैके, जिव्हाळा पालक संस्थेच्या सदस्य श्रीमती शितल सूर्यवंशी, श्री विशाल सगर इत्यादींची उपस्थिती होती. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी श्री सतीश करे, श्रीमती श्रीशैल्य पैके, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा लातूर मार्ड संघटनेचे पदाधिकारी व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर येथील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तर श्री सुरेश दादा पाटील व डॉ. योगेश निटूरकर यांनी मार्गदर्शन केले.

# 'लाडकी बहीण' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समितीचे गठन आ. भीमराव केराम



किनवट /शेख शौकत :-मुवख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे व सुलभतेने होण्यासाठी शासनाच्या आदेशानुसार ८३ किनवट विधानसभा क्षेत्रासाठी सात सदसीय समिती गठीत केली असून समितीच्या अध्यक्षपदी आमदार भीमराव केराम यांची तर सदस्य सचिव म्हणुन बाल विकास प्रकल्प अधिकारी किनवट यांची नेमणूक केली आहे. सदर समिती किनवट विधानसभा क्षेत्रांतर्गत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी करून मंजुरीस्तव जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविणार आहे. राज्यातील शिंदे फडणीस सरकारने दुर्बल घटकातील महिलासाठी राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्वकांक्षी योजना सुरू केली आहे. किनवट माहूर तालुक्यात या योजनेचे महिला वर्गांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र महिलांची झुंबड उडाली आहे. गावातील अंगणवाडी सेविका नगरपालिका कार्यालय तसेच तहसील कार्यालयाच्या सेतू सुविधा केंद्र मार्फत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे प्रस्ताव ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने स्वीकारले जात आहेत. या योजनेअंतर्गत एकाच कुटुंबातील विवाहित व अविवाहित अशा दोन महिलां पात्र ठरणार असून प्रस्ताव मंजुरीनंतर लाभार्थ्यांच्या खात्यात प्रतिमाह दीड हजार रु अनुदान देण्यात येणार आहे. रक्षाबंधन या सणानिमित्त पहिला हफ्ता देणार असल्याची चर्चा असली तरी त्याला अधिकृत दुजोरा मिळाला नाही. या योजनेअंतर्गत प्राप्त प्रस्तावाची छाननी करण्याचे काम प्रशासकीय यंत्रणेमार्फत युद्ध स्तरावर सुरू असून त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालय, ग्रामविकास मंत्रालय तसेच पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे व सुलभतेने होण्यासाठी विधानसभा क्षेत्रनिहाय सात सदसीय समिती गठित केली असून ८३ किनवट विधानसभा क्षेत्रासाठी गठीत केलेल्या समितीच्या अध्यक्षपदी आमदार भीमराव रामजी केराम, अशासकीय सदस्य म्हणुन वैजनाथ पंढरीनाथ करपुडे, सुदर्शन जोगराम नाईक गटविकास अधिकारी, नांदेड वाघाळा मनपाचे आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेले सदस्य, विधानसभा परिक्षेत्राचे तहसीलदार तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी किनवट यांची सदस्य सचिव म्हणुन नेमणूक करण्यात आली आहे. सदर समिती जिल्ह्यात प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करून संभाव्य पात्र लाभार्थी महिलांच्या याद्या जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करतील.

# कास पठार फुलांनी बहरले

सातारा : सातारा जिल्ह्यातील पर्यटनाचा केंद्रबिंदू जागतिक वारसास्थळ असणा-या कास पुष्प पठारावर नैसर्गिक रंगीबेरंगी रानफुलांच्या कळ्या उमलण्यास प्रारंभ होऊ लागल्याने येत्या आठ-दहा दिवसांत पावसाने उघडीप दिल्यास किंवा ऊन-पावसाचा खेळ सुरू झाल्यास दहा ते पंधरा दिवसांनी फुलांच्या मुख्य बहराला प्रारंभ होईल. त्यामुळे वनसमितीची हंगामाच्या पूर्वसंध्येला नियोजनाची लगबग सुरू झाल्याचे दिसत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून सतत पडणा-या पाऊस आणि दाट धुक्यात कास पठार काहीसे लुप्त झाल्यासारखे वाटत होते. गेल्या दोन-तीन दिवसांपासून कास परिसरात पावसाने काहीशी उघडीप घेतल्याने कास पठाराचे मनमोहक दृश्य दिसू लागले आहे. पांढ-या रंगाच्या चवर या फुलांनी कास पठार बहरले असून, काही ठिकाणी गालिचे पाहायला मिळत आहेत. गेंद, तेरडा, सीतेची आसवे, टूथब्रश, नीलिमा, रानहळद आदी विविध दहा ते पंधरा जाती-प्रजातीच्या रंगीबेरंगी फुलांच्या कळ्या उमलण्यास प्रारंभ झाला असल्याने वनसमितीसह पर्यटकांना हंगामाची चाहूल लागली असून, वनसमितीची हंगामाच्या पूर्वसंध्येला नियोजनाची लगबग सुरू झाली असून, वाहनतळ, स्वच्छता, रस्त्यात आलेली झुडपे हटविणे, खड्डे भरणे, हंगामासाठी कर्मचा-यांची नेमणूक करणे आदी कामे सुरू असून, उर्वरित नियोजन येत्या दहा-बारा दिवसांत पूर्ण करण्यात येईल.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE